लोकमत

# ‘रवळनाथ’ला सव्वादोन कोटींचा निव्वळ नफा : एम. एल. चौगुले

## कोरोनानंतरही कामगिरीचा वाढता आलेख कायम

गडहिंग्लज : मार्चअखेर श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या ठेवीत तब्बल ४० कोटींची वाढ होऊन एकूण ३८० कोटींच्या ठेवी झाल्या. कोरोनानंतरही कामगिरीचा वाढता आलेख कायम आहे. गतवर्षी ६४१ कोटी वार्षिक व्यवसाय होऊन २ कोटी २४ लाखांचा निव्वळ नफा झाला आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम.एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, ३१ मार्चअखेर सभासद संख्या १०,६६६ इतकी आहे. २६१ कोटींची कर्जे दिली आहेत. खेळते भांडवल ४३७ कोटींचें असून, एकूण गुंतवणूक १४९ कोटींची आहे. संस्थेत सध्या मोबाइल बँकिंग, सी.बी.एस., मायक्रो एटीएम याद्वारे डिजिटल सेवा दिली जाते, तसेच RTGS/NEFT, लॉकर, वीज बिल भरणासह पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल ॲटोमेटेड क्लिअरिंग हाउस (नॅच), तसेच गंभीर आजारी व वयोवृद्धांना घरपोच सेवा दिली जाते. संस्थेला स्वतंत्र 'आयएफएससी कोड'ही आहे.



गडहिंग्लजमध्ये संस्थेचे स्वमालकीचे प्रधान कार्यालय आहे. एकूण १० पैकी गडहिंग्लज, कोल्हापूर, जयसिंगपूर, कुडाळ, सांगली या शाखादेखील स्वमालकीच्या इमारतीत आहेत. सध्या आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी कुडाळ, सांगली याठिकाणी शाखा आहेत. प्लॉट खरेदी व गृहकर्जाची मर्यादा ९० लाख, तर शैक्षणिक कर्जाची मर्यादा ५० लाखांपर्यंत आहे. सोने तारण व गृहोपयोगी उपकरणे खरेदी कर्ज सुविधा उपलब्ध आहे.

याकामी उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, सर्व संचालक, शाखा सल्लागार, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मायदेव, सर्व अधिकारी, शाखाधिकारी व कर्मचारी यांच्यासह, सभासद, ठेवीदार, कर्जदार व ग्राहक यांचे मोलाचे सहकार्य लाभले, असेही चौगुले यांनी सांगितले.